# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

**दशावतारी नाटय महोत्सव :-**

परंपरागत दशावतारी नाटय महोत्सव हे सिंधुदुर्ग जिल्ह्याचे एक खास वैशिष्ट आहे. तीनशे वर्षापुर्वीच्या जुन्या लोककलेला तळ कोकणात विशेष महत्व आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात दरवर्षी दहिकाल्यात (गावची जत्रा) वार्षिक उत्सव म्हणून दशावतारी नाटके सादर केली जातात. नाटकाची कोणतीही संहिता नसतांना फक्त पौराणिक कथेच्या आधारे संपुर्ण नाटकाचे सादरीकरण केले जाते.

कोकणातील या पुरातन नाटय कलेचे जतन व्हावे, स्थानिक नाटय कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मंडळाने सन १९७६ मध्ये ही स्पर्धा सुरू केली. गेली ४ दशके ही स्पर्धा अव्याहतपणे सुरू आहे. सहभागी संघांना सादरीकरण खर्च मंडळातर्फे दिला जातो. प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषक प्राप्त संघांना रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र दिले जाते. २ संघांना उत्तेजनार्थ पारितोषिक दिले जाते.

दि.११ ते २८ मे २०१६ दरम्यान ४० वा दशावतारी नाट्य महोत्सव पार पडला. दरवर्षी यात १८ संघ सहभागी झाले होते. कुडाळ जि.सिंधुदुर्ग येथे हा महोत्सव झाला. खानोलकर दशावतारी नाट्यमंडळ - खानोली यांच्या रणदुदुंभी या नाटकास प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले. आजगावकर दशावतारी नाट्य मंडळ- आजगाव यांनी सादर केलेल्या सांब लक्ष्मणा विवाह यास द्वितीय, तर ओम वीरभद्र दशावतारी नाट्य मंडळ - भांडुप यांनी सादर केलेल्या गुराख्याची शिदोरी या नाटकास तृतीय पारितोषिक देण्यात आले.